# दिवाणी किरकोळ अर्ज क्र.०१/२०१८ मध्ये निशानी ०१ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेगुलेशन कायदा,१८२७ चा नियम VIII(iii)अन्वये वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत सादर करण्यात आला आहे. अर्जदारांचे कथन की, मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद हे अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ चे वडील आहेत. मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद यांचा दि.१८/०९/२०१६ रोजी दिर्घ आजाराने मृत्यु झाला. मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद यांचे मृत्युपश्चात अर्जदार क्र.१ ते ३ हे त्यांचे कायदेशीर वारस आहेत.

०२. अर्जदारांचे पुढे असे कथन आहे की, मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद हे हयात असतांना त्यांचे नांवे मौजा दिग्रस चांदनगर येथील विभागामध्ये शासनाचा किरकोळ केरोसीन वितरक म्हणुन केरोसीन विक्रीचा परवाना क्र.०४/२००० तसेच स्वस्त धान्य दुकान परवाना क्र.०५/२००० होता आणि मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद यांचे सदरहु परवानाव्दारे चालवित असलेल्या व्यवसायावरच अर्जदारांचा संपुर्ण उदरनिर्वाह अवलंबुन आहे. मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद यांचे मृत्यु पश्चात अर्जदार क्र.१ने जिल्हा पुरवठा अधिकारी साहेब यांचेकडे मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद यांचे नांवे असलेले सदरहु परवाने तिचे नावाने हस्तांतर करुन मिळण्याबाबत अर्ज केला होता. तेव्हा जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी दि.२४/१२/२०१७ रोजी तसेच दि.०५/०४/२०१७, दि.१९/०५/२०१७ व दि.०४/१२/२०१७ रोजी तहसिल कार्यालय दिग्रस मार्फत अर्जदाराच्या अर्जामध्ये त्रुटी दर्शवुन अर्जदार हीने सक्षम न्यायालयाकडुन सदरहु परवाने हस्तांतर करण्याबाबत मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्राची मागणी केली होती. त्यामुळे अर्जदारांना सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदारांनी प्रस्तुत प्रकरण वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केले आहे. सदर अर्जाव्यतिरिक्त या कारणासाठी अर्जदारांनी कोणताही मामला कोणत्याही न्यायालयात दाखल केला नसुन न्याप्रविष्ठ नाही.

०३. प्रस्तुत अर्जात कोणीही गैरअर्जदार नसल्याने अर्ज दाखल झाल्याची जाहीर नोटीस दैनिक हिंदुस्थान वर्तमानपत्रात प्रकाशित करण्यात आली आणि हरकत, आक्षेप मागविण्यात आले. परंतु अर्जदारांच्या अर्जाला विरोध करणारा कोणताही आक्षेप न्यायालयास प्राप्त झाला नाही. अर्जदार क्र.१ श्रीमती फरकुंदा अ.साजिद यांनी स्वतःचे साक्ष शपथपत्र निशानी १० प्रमाणे सादर केले. तसेच

कागदोपत्री पुरावा म्हणुन दि.१९/०५/२०१७ रोजीचे जिल्हा पुरवठा अधिकारी यवतमाळ यांचे वारस प्रमाणपत्र हजर करणेबाबत पत्र निशानी १२, दि.०५/०४/२०१७ रोजीचे तहसिलदार दिग्रस यांचे वारस प्रमाणपत्र हजर करणेबाबत पत्र निशानी १३, दि.०४/१२/२०१७ रोजीचे जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे मा.तहसिलदार दिग्रस यांना पत्र निशानी १४, जिल्हा पुरवठा अधिकारी यवतमाळ यांचे दि.०४/१२/२०१७ रोजी तहसिलदार दिग्रस यांना दिलेले पत्राची छायांकित प्रत आर्टीकल–१, अर्जदार क्र.१ यांचे पती मयत अब्दुल साजिद अब्दुल मजिद यांचे मृत्यु प्रमाणपत्राची छायांकित प्रत आर्टीकल–२, अर्जदारांचे रहीवास प्रमाणपत्राची छायांकित प्रत आर्टीकल–३, आधारकार्डची छायांकित प्रत आर्टीकल–४, ५, ६, अर्जदारांचे शिधापत्रिकेची छायांकित प्रत आर्टीकल–७, मयत अब्दुल साजिद यांचे नांवाने निर्गमित स्वस्त धान्य दुकानाच्या परवान्याची छायांकित प्रत आर्टीकल–८, मयत अब्दुल साजिद यांचे नांवाने निर्गमित केरोसीन वितरण परवान्याची छायांकित प्रत आर्टीकल–९ आणि दै.हिंदुस्थान वर्तमानपत्रातील दि.०६/०१/२०१८ रोजीची जाहीर नोटीस निशानी १५ प्रमाणे सादर केले आहेत. अर्जदारांनी पुरसिस निशानी १६ सादर करुन पुरावा बंद केला.

०४. अर्जातील मजकूर, शपथपत्र, अभिलेखावरील दस्त विचारात घेता अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद यांचे वारस असल्याचे सिध्द होते. त्यामुळे अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या नांवे वारस दाखला देण्यास हरकत नाही. करीता प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याबाबत खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत केला आहे.

## अंतिम आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला.

२. अर्जदार क्र.१ नामे श्रीमती फरकुंदा अ. साजिद, क्र.२ नामे कु.नुरैन फातीमा अ.साजिद आणि क्र.३ नामे शेख आरहान अ.साजीद, सर्व रा.चांदनगर, दिग्रस, ता. दिग्रस, जि.यवतमाळ, हे मयत अब्दुल साजीद अब्दुल मजिद यांचे वारस आहेत, असे घोषीत करण्यात येते. त्यांच्या नांवे बॉम्बे रेगुलेशन १८२७ चा नियम VIII(iii)अन्वये नियमाप्रमाणे योग्य कोर्ट फी स्विकारुन वारस प्रमाणपत्र प्रदान करण्यात यावे.

**(आ.न.पठाण)**

**दि.२०.०२.२०१८.** **दिवाणी न्यायाधिश क.स्तर, दिग्रस.**